# अक्षरब्रह्म

## साधकास पत्रे

सद्गुरू गुरुनाथ वि. मुंगळे

**श्री सद्गुरू फौंडेशन**

मु. पो. नृसिंहवाडी, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

|| श्री ||

## आहेर निजतृप्तीचा

अक्षरब्रह्माचे स्फुरण म्हणजे श्रीगुरूंनी केलेला निजबोधच आहे. श्रीगुरुंची कृपा जेव्हा साधक हृदयात प्रचितीरूपाने जाणवत राहते तेव्हा वाचा अनावर होऊन अक्षरे बाहेर पडण्यास उतावीळ होतात. यातील सर्व पत्रे हा उपदेश नाही, अनुभव आहे. वयाच्या सोळाव्या वर्षापासून ते आजपावेतो, आज मला पासष्ठावे वर्ष आहे. जो काही प्रसाद प्राप्त झाला, ज्या अनुभूती आल्या, त्या सर्व अनुभूती भगवद्‌साधन माध्यमातून, अनुसंधानातून, चिंतनातून, अंत:करणात दृढ झाल्या आहेत. श्रीगुरुंच्या प्राप्तीसाठी श्रीगुरुसेवा हेच एकमेव उद्दिष्ट ठेवून आयुष्यात वाटचाल करण्याचा प्रयत्न केला. द्वैतातील जीवन संघर्षमयच असते. असे जीवन कधी हसवते, कधी सतावते, कधी रडवते. सर्वसामान्य जीवांच्या बाबतीत जे घडते ते माझ्याही बाबतीत घडले. एक अचिंत्यमहिमान अशी, विश्वाचे प्रवर्तन व प्रचलन करणारी शक्ती निश्चित अस्तित्वात आहे. अशी स्वभावत:च धारणा असल्याने, एकंदर विश्वप्रचलनाच्या मागे कोण आहे या जिज्ञासेने साधकजीवनात जे आवश्यक असते, ते यथाशक्ती सद्‌गुरूंच्या कृपेने करण्याचा प्रयत्न केला. असा प्रयत्न चालूही आहे आणि शेवटपर्यंत श्रीगुरूंनी कृपाळूपणे चालू ठेवण्यास म्हणजेच माझ्या साधनेस आधारभूत होऊन कृपाप्रत्ययाच्या पांघरुणातून तो निष्ठापूर्वक करवून घ्यावा, अशी त्यांच्या चरणी प्रार्थना आहे. पारंपारिक सांस्कृतिक वाङ्मय, साधनमार्गातील साधकबाधक विचार, औपनिषदिक तत्त्वज्ञान, ज्यांच्या अध्यात्मिक अनुभूती सुरेख, सुंदर व सम्यक होत्या अशा भक्तांची चरित्रे, त्यांनी केलेला बोध, सिद्धांची चरित्रे, भारतीय तत्त्वज्ञानाला आधारभूत असलेला गीताबोध, संतवाङ्मय आणि तौलनिक अभ्यास तसेच भारतीय मानसशास्त्राला धरून असलेली भगवान पतंजलींची योगसूत्रे यांचा अभ्यास काही अधिकारी व्यक्तींच्या मार्गदर्शनाखाली करण्याचा माझ्या कुवतीनुसार प्रयत्न केला व आजही हे चिंतन चालू आहे. अनेक सत्पुरुषांच्या व सिद्ध पुरुषांच्या भेटीगाठी, नित्य नैमित्तिक उपासना तसेच प्रारब्ध कर्मानुसार प्राप्त झालेला प्रपंच या सर्वांतून वाटचाल करत असताना अनेक कठोर प्रसंगांना तोंड द्यावे लागले. कित्येक वेळा दमलो, थकलो, नैराश्याने ग्रासले. आपल्या आयुष्यात निखळ सुख, समाधान नाही म्हणून प्रसंगानुरूप सर्व काही सहन करत करत जे काही घडते आहे ती भगवद् इच्छाच आहे हा विचार दृढ करून श्रीगुरूंच्या कृपेनेच

साधनरत राहिलो. नियतीची प्रबल सत्ता प्रापंचिक स्तरावर निकटतेने अनुभवली. हे सर्व काही असले तरीही भगवद्कृपेने आतूर होऊन अनेक ठिकाणी धाव घेतली. कीर्तने, प्रवचने, निजबोधातून प्रकट होणारे विचार, श्रीभगवंताचा महिमा या गोष्टी कानावरून सतत जाव्यात असे वाटत असल्याने त्यासाठीही निश्चयपूर्वक, हट्टाने मी प्रवृत्त होत असे. या प्रवृत्तीतून मन संतुलीत ठेवण्यास, सतत अभ्यास करण्यास तसेच अंतर्मुख होण्यास, चिंतनशील राहण्यास व तत्त्वशोधनासाठी अधिकाधिक प्रयत्न करण्यास श्रीगुरूंच्या कृपेनेच मदत झाली. अनेक वेळा विषादातून सर्व काही बंद करावे अशा प्रकारचे विचार येत असत. भावभावनांचे अनेक कल्लोळ अभिप्रेत असलेल्या भूमिकेवर आघात करत असत. मनाची समजूत घातली तरीही मन ती स्वीकारावयास तयार होत नसे. अशा वेळी माझी दैनंदिन साधना व भगवान रामकृष्णांचे विचार माझ्या मदतीला येत. अर्थात त्यातून मिळणारा दिलासाही सद्‌गुरुच देतात अशी माझी दृढ धारणा असल्याने मानसिक अशक्ततेला शह दिला जात असे व पारमार्थिक धारणा दृढ होण्यास मदत होत असे. दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, नामदेव गाथा, तुकाराम गाथा, एकनाथी भागवत या ग्रंथांनी माझ्यावर अमृताचा वर्षाव केला. श्रीगुरुचरित्र, श्रीकृष्णविजय, नवनाथ हे ग्रंथ व श्रीगुरुंचे नाम हा माझ्या नित्य उपासनेचा विषय असल्याने संतवाङ्मयाचा व संतांचा मी दृढ उपासक झालो. अर्थात या 'मी'च्या मागे सद्‌गुरुच आहेत, अशी माझी दृढ धारणा आहे. सन १९५६ ते १९७३ पर्यंत माझ्या पारमार्थिक अट्टाहासाचा विलक्षण संघर्षमय असा काळ होता. १९६९च्या त्रिपुरी पौर्णिमेला सद्‌गुरु स्वामी स्वरूपानंदांनी कृपायमान होऊन आपण होऊन दृष्टांताद्वारे पावसाला येण्याची आज्ञा केली व सोऽऽहं साधनेचा मार्ग सांगून गुरुपदेश दिला. श्रीगुरुंच्या ठिकाणी अनन्य निष्ठा हवी अशी माझी धारणा असल्याने अव्यक्त परब्रह्म भगवान दत्तात्रेय व त्यांचे पूर्णावतार श्रीपादश्रीवल्लभ व श्रीनृसिंहसरस्वती यांच्या उपासनेचा माझा स्वाभाविक छंद, अट्टाहास, नेम व निश्चय असल्याने गुरुद्रोह होऊ नये म्हणून माझ्या प. पू. सद्‌गुरुंना अत्यंत विनयपूर्वक मी दत्ताची उपासना सोडणार नाही असे सांगितले. त्यावर त्यांनी केलेले स्मितहास्य आताही मला जसेच्या तसे जाणवते. पुढे साधनायोग काळात, **'एकात एक भरून आहे। भिन्नता तेथ कैसी राहे।'** याचा प्रत्यय आला. आपले या जगातील राहणे यास परमार्थाच्या परिभाषेत भौतिक जीवन असे म्हणतात. येथे चालत असलेला वृत्तीविलास देवघेवीशी निगडीत आहे. जीवनक्रम मोठ्या विलक्षण अनुभूती देतो. देहभावातील जगणे केवळ तात्कालीक आनंद, दुःख, नैराश्य, यशापयश इत्यादी गोष्टींशी संलग्न असते. प्रपंच आणि परमार्थ या दोहोंचाही समग्र विचार करत असताना विचारस्थैर्य व मनाची संतुलीत अवस्था राहतेच असे नाही. व्यग्रतेपोटी जेव्हा मी हताश होत असे तेव्हा रामकृष्णांचा अक्षय बोध त्यांच्या एकाच

वाक्यातून प्रत्ययास आला ते म्हणजे 'जितक्या व्यक्ती तितके मार्ग।' रामकृष्णांचे व सर्वच संतांचे जीवन जरी मनोरंजक असले तरी मनोभंजन हा त्यांच्या यशाचा पाया आहे असे मी मानतो. असे मानण्यास श्रीगुरुंनीच निजबोध करून मला शिकविले. सारखा 'मी' या शब्दाचा वापर रुचत नाही, बोचतो पण प्रगटीकरण करत असताना नाईलाज म्हणून त्याचा वापर करत आहे. माझ्यातील 'मी' मी रमण महर्षींच्या 'मी'ला चिकटविलेला आहे. त्यातून जी तद्रुपता झाली त्या तद्रुपतेतून मी सद्गुरुंना विचारतो, आपण सर्व संतांचे साक्षात्कारी महात्म्यांचे, सिद्धांचे केले 'माझे काय?' हा प्रश्न अथर्व ज्ञानपीठातील सर्व साधकांनी आपल्या चिंतनात ठेवावा असे मला वाटते. या प्रश्नाच्या अनुभूतियुक्त उत्तरासाठी साधनेत तडजोड नको हे सूत्र ध्यानात ठेवावे. जगद्व्यवहाराचा विचार केला असता परस्परावलंबित्व टाळता येत नाही हे खरे आहे. लौकिकात याच परस्परावलंबित्वावर सुखदु:खाची वाटणी होत असते. संतांनी '**एकमेका सहाय्य करू। अवघे धरू सुपंथ।**' असे विधान केले आहे. लहानपणी जेव्हा मी या विधानाचा विचार करीत असे तेव्हा मलाही संत व्यवहारीच वाटायचे. माझी आई, आजोबा व आजी हे मला प्रेमाने सांगत असत. 'अरे संतांचा व्यवहार वेगळा असतो बरे का!' मी माझ्या आजोबांना खोडसाळपणे विचारले, 'कसा असतो ते सांगा.' तेव्हा ते म्हणाले, त्याला 'आत्मव्यवहार' असे म्हणतात. तो साधना केल्याशिवाय समजत नाही. ते सांगत असताना त्यांच्या तोंडातील भक्तिप्रेमाची लाळ आणि डोळ्यातील प्रेमाश्रू आजही मला स्मरतात. संतांचे एकमेका सहाय्य करू म्हणजे भक्तिप्रेम दृढ करणे हेच होय.
मनोमालिन्यातून निर्माण होणारे विक्षेप, शंका, देहभावातून निर्माण होणारी व्यवहारी वृत्ती, संतांच्या व्यवहारात नसते कारण त्यांना अभिप्रेत सुपंथच असतो. हा सुपंथ आत्मविद् होण्यास मदत करतो. जगातील सर्व देवघेव ही लौकिकाशी निगडीत असते. त्यातून परमार्थ वजा केला तर! पण यातूनच वाट काढावयास हवी. आपणाला हवे ते मिळतेच असे नाही. नाहीतर जगातील सर्व रौद्र विषमता नाहीशी झाली असती. हा विचार जेव्हा पक्का झाला तेव्हा मनाशीच ठरवून टाकले की अपेक्षाच करावयाची नाही. अपेक्षाभंगाचे दु:ख लहान असो वा मोठे असो, कशाला सोसत राहावयाचे?
द्वैत जीवनातील वाटचाल करत असतानाच अचानक सद्गुरू स्वामी स्वरूपानंदांनी गुरुपदेश करून कृतार्थ केले. स्वामी म्हणत असत, त्यांचे जीवन त्यांच्या सद्गुरूंच्या चरणांची उपासना करूनच कृतार्थ झाले तसेच माझेही म्हणणे आहे. सद्गुरूकृपेने साधनमाध्यमाचा वापर करत असताना बालपणापासूनच अनेक दिव्यानुभूती येत असत. त्यांचे विश्लेषण आणि संश्लेषण करण्यापेक्षा त्या अनुभूतींनी माझा साधकभावपिंड पुष्ट होत होता हे सांगताना मला बरे वाटते. श्रीगुरुकृपेने उपासनेवर, साधनेवर माझे प्रेम बसले आहे. ते अवीट गोडी निर्माण करत असल्याने वाढतच आहे. परवाच मला एका विद्वान

गृहस्थाचा दूरध्वनी आला. त्याने विचारले होते 'सद्गुरुंपेक्षा श्रेष्ठ कोण?' माझ्या मुखातून सहजोद्गार बाहेर पडले, सद्गुरुंपेक्षा सद्गुरुंवरचे प्रेम श्रेष्ठ आहे. या भरतवर्षाची समृद्धी अध्यात्मिक परंपरा तसेच मृत्यूलोकातील परमप्राप्तीसाठी निर्माण झालेल्या सर्व परंपरा, विचारधारा, सांप्रदायिकत्वाचा अट्टाहास, विविध साधनामार्ग, आत्मसुखाची जाणीव देणारे भावविचार व सर्व मार्ग हे सर्व काही जेव्हा पाहतो, वाचतो तेव्हा असे वाटत राहते की भगवंत साधकाला भेटावयाला, त्याच्याशी तद्रुप व्हायला तयार आहे. भगवंताची तयारी व साधकाची तयारी यांचा मेळ बसावयास हवा. माझ्या वैयक्तिक अनुभवातून मला असे म्हणावेसे वाटते की, साधना उत्तम करतो व ज्याच्या आतील अनुभूती दृढ होत असतात, त्याला त्याच्या आतील सहनशिलता सुरक्षित करावी लागते. याचे कारण असे आहे की बाह्यवृत्तीप्रवाह हा आंतरिक वृत्तींशी मिळताजुळता असतोच असे नाही. भगवंताशिवाय अन्य सर्व वस्तूत उणेपणा आहे याची जाणीव साधकाला होते. या जगद्व्यवहाराचा विचार केला तर प्रसंगोपात्त मिळतेजुळते घ्यावयास लागतेच. ती ही भगवंताची इच्छा मानावयास हरकत नाही व तशी मनात असेल तोच खरा साधक. असा बोध साक्षात्काराच्या संबंधात जे वाङ्मय निर्माण झाले, त्या वाङ्मयात, सिद्धवाणीत, तसेच सत्पुरुषांच्या सहवासात मिळत असतो. श्रीभगवद्कृपेने गेली ३० वर्षे व्याख्याने, प्रवचने या माध्यमातून तसेच लेखनमाध्यमातून हजारोंना मार्गदर्शन करण्याचे भाग्य मला लाभले. प्रेमाची शक्ती काय असते याची अनुभूती आली. अंतर्मुखतेत वाढ होऊन भगवंताशिवाय अन्य विषयच नको अशी ठाम धारणा झाली. लौकिक व्यवहारातील खऱ्या खोट्याचे अनेक प्रत्यय आले. ईश्वरप्रेमात मत्त होऊन सत्कर्मे करीत राहावे असाही निश्चय झाला. कर्मसमर्पण प्रवृत्ती दृढ झाली. 'उपासनेचा सत्याश्रयो!' हे ब्रीदवाक्य झाले. नेमाचे, निश्चयाचे व हट्टाचे साधन प्राणपणाहून प्रिय झाले. चमत्काराचा तिटकारा वाटतो. अवास्तव काही कथन करून आपण काही वेगळे आहोत असे वाटणे अत्यंत गैर आहे कारण त्यातून निर्माण होणारा अहंकार पारमार्थिक भूमिकेवर निश्चित आघात करतो याचा अनुभव अनेकांच्या बाबतीत प्रत्ययास आल्याने कोणत्याही कर्माच्या बाबतीत ती भगवंताची देणगीच असते. अलक्ष्मीचा तिटकारा करावा असे विश्वातील यच्चयावत् परमार्थातील अधिकारी महापुरुषांचे म्हणणे आहे ते सत्य आहे. सत्वस्थ होऊन संचार करत असताना मी ही भगवंताच्या प्रेमानंदात होतो. २ ऑगस्ट १९९९ या दिवशी माझी ज्येष्ठ कन्या सौ. गायत्री, तिचा मुलगा चि. अथर्व तसेच माझे मित्र श्री. गजाननराव वाघ यांचा मुलगा नचिकेत यांचा अपघाती मृत्यू झाला. प्रपंचातील हा धक्का केवळ असह्य होता. आजही माझा मानसपिंड, आमच्या घरातील सर्वच चि. सौ. गायत्रीच्या आठवणीने क्षणाक्षणाला अती व्याकूळ होतात. आपण राहतो त्या लोकाचे नाव मृत्यूलोक आहे,